नि.३७ लगत.

**वादीचा साक्षीदार क्र.२ चा उर्वरीत सरतपास विधिज्ञ श्री. आर.डी. किंदर्ले यांचे मार्फत सुरु शपथेवर सुरू –**

नि.क्र.३७ वरील शपथपत्रावरील मजकुर मी वाचून पाहून बरोबर असल्यानंतर सही केली. धनराज चव्हाण याने खरेदीखत रामदास किसन गजभिये याच्या नावे करुन दिले होते त्यावर मी साक्षीदार म्हणून सही केली होती. त्यादील मजकुर बरोबर आहे. त्यावर विकणारा धनराज याची सही आहे, माझी व नामदेव याची साक्षीदार म्हणून सही आहे. त्यावर सब रजिस्टारची सही व शिक्का आहे. सदर खरेदी खतास **निशाणी क्र. ४३** देण्यात येते.

DISTRICT COURT NAGPUR

**प्रतिवादीतर्फे उलटतपास विधिज्ञ श्री. लुभेश मेश्राम यांचे मार्फत सुरु**

२. अर्जणवीस मेश्राम याच्याकडे माझे जाणे येणे होते. आता मी अर्जणवीसची कामे करत असतो. हे म्हणणे खरे नाही की, मी बरेच ठिकाणी साक्षीदार म्हणून काम करतो. सदर जीमणीचा व्यवहार कुठे आणि किती पैशांमध्ये झाला याबाबत मला माहित नाही. सदर जमीण सामाईक होती का याबद्दल मला माहिती नाही. सदर व्यवहारामध्ये विकणा–याचे मालकी हक्क दर्शविणारा ७/१२ उतार सदर खरेदीखतामध्ये जोडला नाही तसेच घेणारा याने देखील ७/१२ उतारा जोडला नाही. तसेच त्यांच्या जमिणी होत्या किंवा नाही याबाबत मला कप्लना नव्हती. तसेच दिनांक १०.०४.१९९३ रोजी विकणा–यांच्या बहिणींनी हक्क सोडला का याबाबत मला माहिती नव्हती. तसेच दिनांक १०.०४.१९९३ रोजी हक्क सोडल्याचा लेख सदर खरेदी खतासोबत जोडलेला नाही. ७/१२ नुसार १.५२ आर. जमिणी दाखवत आहे परंतु त्यापैकी ०.७६ आर.

जमिणी वेगळी केली नाही. तसेच ०.७६ आर. जीमण विकण्याचा अधिकार असल्याबाबत कोणतेही कागदपत्र सदर खरेदीखतासोबत जोडले नाही. तसेच त्यांच्यामध्ये वाटणीपत्र झाले कच्चे किंवा पक्के याबाबत कोणतेही कागदपत्र सदर खरेदीखतासोबत जोडले नाही.

३. ज्या व्यक्तीचे ७/१२ आहे व जमिणीचा मालक असता आणि त्याच्या ताब्यात जमिण असते तो त्या जमिणीवर जात येत असतो. तसेच धनराज चव्हाण राहणार धानवाडा हे या सदर जमिणीवर जाणे येणे करत होते. हे म्हणणे खरे आहे की, ७/१२ नुसार सदर जमिण सेवा सहकारी संस्था याच्याकडे ४० हजार रुपयांमध्ये गहाण ठेवली होती.

४. तसेच माझे किती वय आहे व माझी जन्मतारीख काय आहे असे खरेदी खत करतेवेळेस जोडले नाही आणि आज देखील जोडले नाही. शपत पत्रामध्ये नमुद केलेल्या माझे वयामध्ये खाडाखोड केली आहे. भामेवाडा व माझे गाव या मधिल अंतर आठ किलोमिटर आहे. धणराज हा भामेवाडा येथेच पूर्वीपासून रहातो. ज्यावेळेस खरेदीखत झाले त्यावेळेस फुकेश्वर या गावी राहात होता. भामेवाडा व फुकेश्वर हे किती अंतरावर आहे हे माहित नाही. मी शपत पत्रावर जशी सही केली बॅकेमध्ये देखील तशीच सही करतो. आणि ज्यावेळेस खरेदीखत केले त्यावेळेससुध्दा अशिच सही केली आहे. या शपत पत्रामध्ये केलेली सही आणि खरेदीखतावर केलेली सही यात फरक आहे. शपत पत्र माझे सांगण्याप्रमाणे वकिल साहेबांनी लिहून दिले. सदर शपत पत्र माल वाचून दाखविले व सामाजवून देखील सांगिले. तसेच त्याअनुशंगाने कोर्टात साक्ष देण्याचेही सांगितले. सदर खरेदीखतावर खरीददार याची सही नाही.

५. शपतपत्रामध्ये दिनांक १६.०४.१९९३ रोजी मी तहसील

DISTRICT COURT NAGPUR

कार्यालयामध्ये माझे कामानिमित्त आलो होतो परंतु कोणत्या कामानिमित्त आलो होतो हे नमुद केले नाही. सदर खरेदी खत मी वाचून पाहून समजून घेवून सही केली असे नमुद नाही. नामदेव, रामदास आणि मी परिचित व्यक्ती आहोत. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपतपत्रात रामदास किशन गजभिये याची खरेदीखतावर सही आहे असे मजकुर शपत पत्रात चुकीचे नमुद केले आहे. सदर खरेदी खतावर लिहून घेणार रामदास किशन गजभिये याची सही नाही. हे म्हणणे खरे आहे की, कबुल आणि मान्य असा मजकुर सदर खरेदी खतामध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, खरेदी खतावर त्यावेळेस मी कोणतीही सही केली नाही. रामदास गजभिये यांच्यासोबत माझे चांगले संबंध आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यांच्या म्हणण्यानुसार खोटे शपतपत्र दाखल करुन मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ४३ वरील खरेदीखत माझे समक्ष तयार केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, रामदास आणि त्यांचे वारसांच्या सांगण्यावरुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

श्रवणोत्तर स्विकृत

( एम.सी. शेख )
दिवाणी न्यायधीश,प्रथम श्रेणी,
कुही.

दिनांक १४.१२.२०२३

DISTRICT COURT NAGPUR

<u>नि.३७ लगत</u>.

DISTRICT COURT
NAGPUR